Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, लातूर विभागीय मंडळ,
लातूर- ४१३५३१

सुतमिल एरिया, कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर.

**Divisional Chairman Ph :( O) 229258 Divisional Secretary Ph :( O) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com**

जा.क्र.लाविम/उ.मान्यता/ ८८६
दिनांकः- २४।०७।२०२४

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
नांदेड / लातूर / धाराशिव.

**विषय :- सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील मंडळाचे वार्षिक नोंदणी शुल्क भरणा करणेबाबत........**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता मंडळ नियमावलीतील नियम क्र.९४(०७)/४७(१२) मध्ये नमूद केलेल्या मुदतीत (१० ऑगस्ट २०२४ पूर्वी) खाली दर्शविल्याप्रमाणे मार्च २०२५ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची संख्या गृहीत धरून नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | इ.१२ वी नोंदणी शुल्क | इ.१० वी नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| ०१ | ०१ ते १०० विद्यार्थीपर्यंत | रू.१०००/- | रू.१०००/- |
| ०२ | १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांसाठी | रू.४००/- | रू.२००/- |

वरील मंडळ नियमावलीतील नियमानूसार **१० ऑगस्ट पूर्वी** नोंदणी शुल्काची रक्कम जमा न केल्याने राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/१४२ दि.०६.०१.२००३ अन्वये खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | दिनांक | दंड शुल्क |
|---|---|---|
| ०१ | **११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट** | **रू.२००/-** |
| ०२ | **०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर** | **रू.३००/-** |
| ०३ | **०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची. आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत** | **रू.५००/-** |

तेव्हा वरील प्रमाणे नोंद घेवून नोंदणी शुल्क जमा करावे. नोंदणी शुल्क भरल्याशिवाय फेब्रु/मार्च २०२५ परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. नोंदणी शुल्काची रक्कम इतर शुल्काबरोबर पाठवू नये. स्वतंत्रपणे भरणा करण्यात यावी. **तसेच शिक्षण संक्रमण शुल्क रू.५००/- भरणा करावे.**

**टीपः-** १. ज्या शाळा / क महाविद्यालयाची मंडळ मान्यता वर्धितची मुदत संपली असेल, त्यांनी मंडळ मान्यता वर्धितचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्य.) मार्फत शिक्षण उपसंचालक यांचे शिफारशीने त्वरीत सादर करावेत.

**२. ज्या शाळा / क.म.विद्यालयांनी मागील वर्षाचे (सन २०२३-२४) मंडळ मान्यता शुल्क भरणा केले नाही, त्यांनी दंडासह सदर नोंदणी शुल्क त्वरीत भरणा करावे.**

३. सदर शुल्क ऑनलाईन भरणा करावयाचे असल्यास मंडळाचे **इ.१२ वी करीता ICICI बॅंक** खाते क्र. **034101010070** तर **इ.१० वी करीता** खाते क्र. **034101010069** व **IFSC CODE : ICIC0000341** या खाते क्रमांकावर RTGS द्वारे भरणा करावे व भरणा केलेली पावती मंडळ कार्यालयात येवून जमा करावी.

४.सदर शुल्क भरणा करणेसाठी मंडळात रोखीने अथवा रोख रहीत डिजिटल प्रणालीद्वारे कॅश काऊंटरवर मोबाईलद्वारे **क्यु.आर.कोड** स्कॅन करूनही रक्कम भरणा करण्याची सोय उपलब्ध आहे.

विभागीय सचिव
लातूर विभागीय मंडळ,लातूर.

प्रत माहितीस्तव.
१. शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. कार्यालय,लातूर / नांदेड / उस्मानाबाद.